# उल्हासनगर महानगरपालिका

ULHASNAGAR MUNICIPAL CORPORATION

दुरध्वनी क:०२५१– २७२०११९ विस्तार क: २७६ फॅक्स: ०२५१–२७२०१०४


2021-22 Majhi Vasundhara2

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

NATIONAL CLEAN AIR PROGRAMME

जा.क्र.उमपा/पर्यावरण/१९४/ 2022 दिनांक-१४ /०२/ 2022

**विषय :**-उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात माझी वसुधरा अभियान 2.0 अंतर्गत सायकल मॅरेथॉन (Cycle Marathon) आयोजीत करणे.

## दरपत्रक सुचना

उल्हासनगर महानगरपालीका पर्यावरण विभागामार्फत खालिल काम अतितात्काळ करणे करीता इच्छूक संस्थांकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचा तपशिल | आवश्यक संख्या | कामाची किंमत |
|---|---|---|---|
| 1) | उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात माझी वसुंधरा अभियान 2.0 अंतर्गत सायकल मॅरेथॉन (Cycle marathon) आयोजीत करणे . | 01 | – |
| | | | |

## अटी व शर्ती

१ . संस्थ /पुरवठादाराने सिलबंद दरपत्रक पर्यावरण विभागामध्ये दि.१८ /०२ /2022 पर्यंत दु. 12 : 00 वाजेपर्यंत स्विकारले जातील .

२ . दरपत्रकामध्ये नमुद केलेले दर पुरवठा आदेशाच्या दिनांका पासुन सहा महिन्याच्या कालावधीसाठी ग्राहय धरण्यात येतील.

३ . दरपत्रकासोबत स्वप्रमाणीत (self attesed) जी.एस.टी. प्रमाणपत्र व पॅन कार्ड (संस्थेचे /मालकाचे) सादर करणे अनिवार्य आहे . ज्या दरपत्रका सोबत जी.एस.टी. व पॅन कार्ड जोडण्यात आलेले नसेल अशी दरपत्रके पर्यावरण् विभागामध्ये स्विकारली जाणार नाहीत याची संस्थांनी नोंद घ्यावी

४ . इतर नगरपालिका / महानगरपालिकांमध्येकेलेल्या कामाचा अनुभव असल्याचे दर्शवणारी कागदपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे उदा. कामाचे आदेश .

५. संस्था /पुरवठादाराने त्यांचे नाव, संपुर्ण पत्ता व संपर्क दुरध्वनी क्रमांक इत्यादी माहिती देणे आवश्यक आहे.

६ . कोणतेही अट घातलेले दरपत्रक ग्राहय धरले जाणार नाही.

७. संस्था /पुरवठादारास सदर कामाकरिता लागणारा आवश्यक तांत्रिक व क्षेत्रिय कर्मचारी वर्ग यांची व्यवस्था स्वत:च करावी लागेल

८. महानगरपालिकेमार्फत सदर कामाकरिता कोणत्याही प्रकारची मशिनिरी, वाहन,सायकली अथवा तांत्रिक कर्मचारी पुरविण्यात येणार नाही.

९. ठेकेदाराने दर सर्व करासह भरावेत.

१०. सदर कामी कोणत्याही प्रकारची अग्रीम रक्कम मिळणार नाही.

११. सायकल मॅरेथॉन (Cycle Marathon) चांगल्या प्रकारे आयोजित करणे बंधनकारक राहील.

अ) सायकल मॅरेथॉनबाबत बॅनर्स व आवश्यक माध्यमांद्वारे पुर्वप्रसिध्दी करणे.

आ) सायकल मॅरेथॉन कार्यक्रमाचे योग्यप्रकारे सुत्रसंचालन , जनजागृती व व्यवस्थापन करणे.

इ) मान्यवरांचे स्वागत व अल्पोपहाराचे नियोजन करणे.

ई) सायकल मॅरेथॉनचे चित्रिकरण , फोटोशुट व ड्रोनकॅमेराद्वारे शुटिंग / चित्रीकरण महापालिकेस उपलब्ध करुन देणे

उ) सायकल मॅरेथॉनमध्ये सहभागी होणा-या स्पर्धकांना प्रमाणपत्र व स्मृतिचिन्हाचे वाटप करणे.

ऊ) सायकल मॅरेथॉनमध्ये विजेता स्पर्धकाचा प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह अथवा बक्षिसे देवुन सन्मान करणे.

१२. सदरचे काम हे महानगरपालिकेस करुन दिलेल्या करारनाम्याच्या अटीशर्तीनुसार कार्यादेशात नमुद केलेल्या मुदतीत पुर्ण करुन दयावयाचे आहे.

१३. संस्था /पुरवठादाराने नमुद केल्याप्रमाणे सायकल मॅरेथॉन आयोजित करणे आवश्यक असुन उप.आयुक्त (पर्यावरण) व पर्यावरण विभाग प्रमुख यांच्या देखरेखीखाली काम करणे बंधनकारक राहील.

१४. मंजुर संस्था /पुरवठादार यांनी सायकल मॅरेथॉन आयेजित करणेकामी संबंधीत अधिका-यांशी चर्चा करुन कार्यक्रमाची रुपरेषा ठरविण्यात यावी. तसेच महानगरपालिकेच्या विविध विभागाकडुन सहकार्य घेण्यात यावे.

१५. safety requirments :- सदर काम करतेवेळी कोणत्याही व्यक्तीस अथवा / कर्मचा-यास /कामगारास कुठल्याही प्रकारची इजा, अपघात अथवा मृत्यु संभवल्यास (Accident, loss of life) त्याबाबतची सर्व खर्चाची भरपाई व इतर कायदेशीर जबाबदारी संस्था /पुरवठादाराची राहील.

१६. Finance & Legal Liability:- करारातील अटी व शर्तीमुळे तसेच सदोष कामामुळे वित्तिय व कायदेशीर प्रश्न निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी संस्था /पुरवठादाराची राहील.

१८. Subcontract:- सदर कामी सबकॉन्ट्रक्टर/ कंपनी/ठेकेदार/इतर व्यक्ती यांना देता येणार नाही.

१९. सदर काम मिळविण्याकरिता महानगरपालिका अधिकारी यांच्यावर कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्याचे कोणत्याही क्षणी आढळल्यास यशस्वी संस्था /पुरवठादार यांचे दरपत्रक रद्द करण्यात येईल व सदर संस्था /पुरवठादार यांना काळया यादीत टाकण्याची कार्यवाही करण्यात येईल.

२०. संस्था /पुरवठादाराने दरपत्रक सादर करताना दरपत्रकातील नियम व अटी मान्य असल्याबद्दल त्यावर शिक्क्यासह सही केली पाहिजे. जर सही केली नसेल तर असे दरपत्रक विचारात घेतली जाणार नाही.

२१. दर स्विकृतीनंतर संस्थांनी स्वखर्चाने ५०० रू. च्या मुद्रांक पेपरवर करारनामा करणे आवश्यक आहे .

२२ .कोणतेही कारण न देता उल्हासनगर महापालिकेने एक किवा सर्व दरपत्रके स्विकारण्याचा किंवा फेटाळण्याचा हक्क राखुन ठेवला आहे.

२३.सायकल मॅरेथान (Cycle Marathon) आयोजित करतांना कोरोना नियमांचे काटेकोर पालन करणे बंधनकारक राहिल.

(डॉ. सुभाष जाधव)
उप-आयुक्त (पर्यावरण)
उल्हासनगर महानगरपालिका